
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# १९५६ च्या धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीवरील प्रभाव - एक समाजशास्त्रीय अध्ययन

**पद्मानंद मनोहर तायडे[१] , डॉ. बी. एच. किर्दक[२]**
[१]सहाय्यक प्राध्यापक, श्री. तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.
[२]सहयोगी प्राध्यापक, श्री. संत गजानन महाराज महाविद्यालय, बोरगाव (मंजु). जि. अकोला.

**सार :**
*प्रस्तुत संशोधनामध्ये १९५६ च्या धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे त्यामध्ये अमरावती विभागातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा या पाच जिल्हयामधुन प्रत्येक जिल्हयातील अनुक्रमे १० गावांची सहेतुन न्यादर्शन प्रविधीच्या माध्यमातुन निवड करून संशोधनासाठी निवडलेल्या प्रत्येक गावातुन १० ग्रामीण महिलांची लॉटरी पध्दतीच्या माध्यमातुन निवड करण्यात आली आहे. अशा प्रकारे अमरावती विभागातुन एकूण ५० गावांची व या गावामधुन एकूण ५०० ग्रामीण महिलांची निवड केली आहे. संशोधनासाठी आवश्यक तथ्य संकलन करण्यासाठी स्वनिर्मित सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रभावशिलता प्रश्नावलीचा वापर करण्यात आला या प्रश्नावलीचे प्रमाणिकरण तज्ञांच्या माध्यमातुन करण्यात आले तसेच पथदर्शी अभ्यसाच्य माध्यमातुन या प्रश्नावलीची विश्वासनियता व वैधता तपासण्यात आली. प्राप्त तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी पध्दती, वारंवारीता, काई स्क्वेअर या सांख्यिकीय प्रविधींचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनाच्या संदर्भातील तथ्य विश्लेषणावरूण असे आढळून आले की, १९५६ च्या धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीवर प्रभाव पडलेला आहे परंतु या प्रभावाची फलनिष्पत्ती अपेक्षित प्रमाणात आणखी विकसित होणे गरजेचे आहे. त्यासाठी धम्मक्रांतीच्या तात्त्वीक बाबींचा ग्रामीण महिलांमध्ये प्रसार करणे गरजेचे आहे.*



### १.१ प्रस्तावना :

जगाच्या इतिहासात शांततेच्या मार्गाने सामाजिक, धार्मिक क्रांती घडविणारे तथागत गौतम बुध्द व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोन महापुरुष अव्दितीय आहेत. बुध्दांनी ज्ञान प्राप्तीनंतर सारनाथ येथे पहिल्यांदा पाच परिव्राजकांना धम्माची दीक्षा देवून धम्माच्या प्रवर्तनाची सुरुवात केली व जगभरात धम्मक्रांतीची मोठी चळवळ उभी केली. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी पाच लाख लोकांसह बौध्द धम्माची दीक्षा घेऊन पुन्हा एकदा अभुतपूर्व क्रांती घडवून आणली व बौध्द धम्माचे थांबलेले चक्र पुन्हा गतिमान केले. हजारो वर्षांपासुन गुलामीच्या अवस्थेत असणाऱ्या अस्पृश्य समाजाला कोणत्याच प्रकारची हिंसा घडू न देता, फक्त गुलामीच्या गर्तेतून बाहेरच काढले नाही, तर प्रगतीच्या दिशेने गतीमान केले. म्हणुनच ही क्रांती जगातील एक महान क्रांती ठरली आहे.

बुध्दांनी समाजाला समता, स्वातंत्र्य आणि न्यायाची विचारसरणी देवून एका नव्या पर्वाची सुरूवात केली. तत्कालीन समाजावर वैदिक धर्मातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था यांचा प्रचंड प्रभाव होता. अशा परिस्थितीत समतेच्या तत्वावर आधारीत बुध्द तत्वज्ञान लोकांच्या हृदयात पोहचविणे ही एक अद्भूत अशी घटना होती जी बुध्दाने आपल्या धम्माद्वारे साकार केली. त्याचप्रमाणे २०व्या शतकाचा विचार केला असता त्याहीपेक्षा भीषण अशी अवस्था असणारी समाजव्यवस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर होती. जिथे जाती, धर्म, पंथ, भाषा, लिंग, जन्म हेच मानवी समाजाच्या श्रेणीरचनेचे मुख्य आधार होते. ज्यामुळे समाजामध्ये एक मोठी विषमतेची दरी निर्माण झाली होती, ज्यात अस्पृश्य समाज होरपळला जात होता व लिंग भेदावर आधारीत विषमतेमध्ये भारतातील स्त्री अनेक बंधनात अडकवून ठेवण्यात आली होती. फुले, कर्वे, रानडे, आगरकर या बोटांवर मोजण्याइतक्या समाजसुधारकांचा अपवाद वगळता स्त्रीप्रश्नावर कोणीही चर्चा करायला तयार नव्हते. त्यातही दलित स्त्रियांची परिस्थिती तर आणखीनच गंभीर होती. "स्त्री सुधारणा चळवळीच्या उल्लेखांमध्ये केवळ पांढरपेश्या ब्राम्हण स्त्रियांच्या सामाजिक, शैक्षणिक सुधारणेचे विवेचन करतांना दलित स्त्रीचा साधा नामोल्लेखही आढळत नाही." उलट प्राचीन धर्म ग्रंथामध्ये, स्मृतींमध्ये स्त्रियांच्या जीवनात बंधनाची किती जरुरी आहे यावर अनेक तथाकथीत पुरुषांनी लिहून ठेवले आहे.

ग्रामीण स्त्रियांची तर अतिशय दयनिय अवस्था होती. सामाजिक संरचनेच्या दृष्टीकोनातून भारतीय खेडयांना विशेष स्थान होते. भारताचा आत्मा हा खेडयांमध्ये आहे, असे महात्मा गांधीनी म्हटले आहे, परंतु ग्रामीण महिलांच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे त्यामुळे ग्रामीण स्त्री हताश हतबल आणि सर्वच स्तरांवर पिडीत होत आहे.

या सर्व परिस्थीतीला समाजाकडून कुठल्याच प्रकारचा विरोध केल्या जात नसे यामध्ये ग्रामीण दलित महिला भरडल्या जात होत्या. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात "ग्रामीण भागात अस्पृश्य स्त्रिया काही विशिष्ट सणाच्या वेळी हिंदू समाजाच्या करमणुकीसाठी द्याव्यात अशी प्रथा होती" तसेच सतीप्रथा, बालविवाह, विधवा पुर्नविवाह बंदी यासारख्या अनेक अनिष्ठ प्रथा ग्रामीण समाज जीवनात अस्तित्त्वात होत्या. स्त्रियांची ही परिस्थीती लक्षात घेऊन स्त्रीक्रांतीचे उद्गाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांबरोबर स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी मोलाचे कार्य केले आणि स्त्रियांना स्वाभिमानाचे जीवन जगायला शिकविले. १९५६ ची धम्मक्रांती ही त्यापैकी एक प्रमुख घटना आहे, ज्या माध्यमातून ग्रामीण स्त्रियांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्दाच्या तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास केलेला होता. बुध्द तत्वज्ञानात स्त्रियांना सन्मानाची व समानतेची वागणूक दिली जाते, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. बुध्द धम्मा व्यतिरिक्त इतर कुठल्याच धर्मात स्त्रियांना एवढा सन्मान मिळणार नाही, हे त्यांना माहित होते. भारतीय समाजाची दुरावस्था होऊ न देता एकात्मतेची भावना कायम राहावी व समाजातील दुर्लक्षीत घटकांना न्याय मिळावा हिच धर्मांतरामागची भुमिका होती म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी इतर कोणत्याच धर्माला न स्विकारता भारतीय संस्कृतीत उदयास आलेल्या बौध्द धम्माचा स्विकार केला आणि या धर्मांतरातून त्यांनी अनेक हेतू साध्य केले, त्यापैकी ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचा एक प्रमुख हेतू होता जो आजच्या काळातील ग्रामीण महिलांमधल्या आमुलाग्र स्वरुपाच्या बदलाच्या आधारे साध्य झाल्याचे जाणवते.

आधुनिकीकरणाच्या प्रवाहात आज ग्रामीण स्त्रियांच्या स्थितीचे अध्ययन केले असता धम्मक्रांतीनंतर स्त्रियांच्या धार्मिक, आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वच अंगामध्ये परिवर्तन झाल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या या क्रांतीकारी घटनेमुळे भारतीय समाजातील शेकडो वर्षाच्या धार्मिक सामाजिक बंधनाला तडा गेला. स्त्री पुरुषांमधील अन्यायी रचना ही विषमतेवर आधारीत असून तिला झुगारुन देऊन समानतेच्या तत्वावर आधारीत नवीन समाजरचना निर्माण करण्याच्या हेतुने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही धम्मक्रांती केल्याचे आढळते. १९५६ ची धम्मक्रांती ही केवळ एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतरीत होण्याची एक सामान्य घटना नव्हती तर ती शेकडो वर्ष जुन्या वैदिक धर्माच्या जाचक बंधनातून मानवी समाजाला मुक्त करणारी आधुनिक काळातील एक महान ऐतिहासिक क्रांतीकारी घटना होती.

जगातील सर्वच धर्म भारतात आढळतात परंतु हिंदू हा भारत देशातील प्रमुख धर्म मानला जातो. कारण हिंदू धर्माचे लोक भारतात बहुसंख्येने आढळतात. हिंदू धर्म फक्त भारतात आणि नेपाळमध्येच मोठया प्रमाणात आढळतो. त्या तुलनेत बौध्द धम्माचा उदय जरी भारतात झाला असला तरी हा एक जागतिक धम्म मानला जातो. कारण आशिया खंडात अनेक देश बुध्दमय झालेले आहेत. भारतात मात्र सम्राट अशोकच्या काळानंतर बौध्द धम्माची अवनती झाली ती शेकडो वर्षानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या माध्यमातून पुन्हा पुनरुज्जीवीत करण्याची प्रक्रिया १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरमध्ये झाली. ज्याव्दारे लाखो लोकांचे जीवन प्रभावित झाले त्यामध्ये महिला हा प्रमुख वर्ग होता.

१९३५ ला बाबासाहेंबानी धर्मांतराची घोषणा केली, तिला स्त्रियांनी ठिकठिकाणी सभा घेऊन पाठींबा दिला आम्हाला ज्या धर्मात माणूसकीची वागणूक मिळत नाही. असा धर्म नको ही क्षमता अशिक्षीत अडाणी स्त्रियांमध्ये बाबासाहेबांनी निर्माण केली. आंबेडकरपूर्व काळात बराचसा सुस्त असलेला अस्पृश्य समाज आपल्या हक्क व अधिकाराच्या जाणिवेने खडबडून जागा झाला. स्त्रियासुध्दा संमेलने, आयोजीत करु लागल्या, बोलू लागल्या, संघटीत होवू लागल्या. मुलींचे शिक्षण, मुलांचे संगोपन स्त्री पुरुष समता, आत्मरक्षण अशा विषयांवर ठराव पास होवू लागले. "१९५६ च्या धम्मक्रांतीमध्ये स्त्रिया मोठया प्रमाणात सहभागी झाल्या. स्वतः धर्मांतर करुन खेडोपाडी, गावोगावी कार्यकर्त्या स्त्रिया तेथील जनतेला बौध्द समाजाची दीक्षा देण्याचे समारंभ घडवून आणू लागल्या."

आज स्त्रिया विविध क्षेत्रांमध्ये पुरुषाप्रमाणेच कार्य करीत आहेत. ज्ञान क्षेत्रापासून तर क्रिडा क्षेत्रापर्यंत त्या नैपुण्य प्राप्त करीत आहेत. हे धम्मक्रांतीचेच फलीत असल्याचे दिसते. काही प्रमाणात स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार घेतला जावून आधुनिक स्त्री पुरुंषाप्रमाणे मद्यपान, धुम्रपान करतांना दिसतात. या ठिकाणी बुध्दांचे पंचशिल त्यांना परावृत्त करण्यासाठी उपयोगी पडते. बौध्द धम्म स्विकारल्यानंतर स्त्रियांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाले. कुटुंबात करावे लागणारे धार्मिक विधी कमी झाले आणि स्त्रियांना शिक्षण, संघटन यासारख्या बाबींकडे लक्ष केंद्रीत करता आले. कर्मकांड, अंधश्रध्दा, देवदेवता हया सर्व कल्पना बाबासाहेबांनी बावीस प्रतिज्ञा देऊन काढून टाकल्यामुळे प्रगतीचे नवे पर्व सुरु झाले.

धम्मक्रांतीमुळे निकृष्ट दर्जाची कामे दलित स्त्रियांनी त्यागली व सन्मानाचे जीवन स्विकारले. ग्रामीण भागात बलुतेदारी पध्दतीचा ऱ्हास झाला. मुली शिक्षण घेवून स्वतःच्या पायावर उभे राहायला लागल्या. कुटुंबामध्ये होणारे हिंसाचार कमी झाले कारण स्त्री जागरुक झाली होती. तिला शिक्षणामुळे कायदयाचे व स्वतःच्या रक्षणाच्या बाबी कळायल्या लागल्या. धम्मक्रांती ही एक वैचारीक क्रांती होती. हिंदू धर्माने नाकारलेले व्यक्तीचे विचार स्वातंत्र्य पुन्हा बौध्द धम्माच्या स्विकाराने प्राप्त झाले. "बौध्द धम्माचा स्विकार केल्यानंतर स्त्रियांनी जुन्या श्रध्दा, विश्वास परंपरा इत्यादी नाकारल्या आणि विशेष म्हणजे देव धर्माच्या तूरुंगातुन त्यांची सुटका झाली." स्त्रियांची मानसीकता बदलली. पुर्वी पुरुंषाप्रधानतेच्या अधिन राहून जीवन व्यतीत करणे हिच साधारणतः स्त्रियांची मानसीकता होती मात्र धम्मक्रांतीनंतर प्रथमच त्यांच्यात वैचारीक परिवर्तन घडून आले. "बौध्द धम्माच्या स्विकारामुळे बौध्दांच्या मनात वैचारीक क्रांती झाली. त्यांच्यात मोठा मानसिक बदल झाला आहे या बदलाला विचारांचा पक्का पाया आहे."

धम्मक्रांतीचे सर्वात मोठे फलीत म्हणजे भारतीय स्त्रियांचे सक्षमीकरण झाले. मोठया प्रमाणावर स्त्रिया स्वतःच्या पायावर उभ्या राहील्या. त्यांना आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रात स्वातंत्र्य प्राप्त झाले. ही धम्मक्रांतीची मोठी उपलब्धी आहे.

### १.२ संशोधनाचे महत्व :

मानवी सभ्येच्या इतिहासात स्त्री पुरुष दोन महत्वाचे पैलु आहेत. परंतु पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना निम्मतेचीच वागणुक दिल्या गेली आहे. परंतु बुध्दकाळात मात्र स्त्रियांना धार्मिक कार्यामध्ये सहभाग घेण्याची संधी दिली होती. हाच बुध्दाच्या समतेच्या विचाराचा धागा घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ ला धम्मक्रांती केली. या धम्मक्रांतीमध्ये स्त्रियांनी मोठया संख्येने सहभाग घेतला होता. आज स्त्रिया विविध क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने ज्ञानाच्या क्षेत्रापासुन क्रिडा, व्यवसाय, कला क्षेत्रापर्यंत नैपुण्य प्राप्त करीत आहेत. हे धम्मक्रांतीचेच फलीत आहे.

ग्रामीण भागामध्ये स्त्रियांना निम्मतेची वागणूक दिली जायची. बौध्द धम्म स्विकारल्यानंतर या स्त्रियांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाले. दलित स्त्रियांनी निकृष्ठ दर्जाची कामे त्यागली तसेच धार्मिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढला. आज खेड्यापाड्यामध्ये, बुध्द विहारांमध्ये स्त्रिया शुभ्र वस्त्र परिधान करुन एकत्रित येतात व विचारमंथन करतात. तसेच गावोगावी धम्म परिषदांचे आयोजन, विविध धम्माच्या कार्यामध्ये सहभाग, बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण, या सारख्या संकल्पना विकसित होत आहेत. या सर्व बाबींचा अध्ययनामध्ये आढावा घेतला आहे. धम्मक्रांतीमुळे

ग्रामीण स्त्रियांच्या जीवनात वैचारीक क्रांती झाली. हिंदू धर्माने नाकारलेले व्यक्तीस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य पुन्हा प्राप्त झाले. धम्मक्रांतीचे सर्वात महत्वाचे फलित म्हणजे ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरण झाले.

सदर संशोधनाच्या माध्यमातून संशोधकाने अमरावती विभाग म्हणजे पश्चिम विदर्भातील पाच जिल्हयांना अध्ययनासाठी निवडून ग्रामीण महिलांच्या जीवनात धर्मांतराच्या प्रक्रियेचा काय प्रभाव जाणवतो याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

### १.३ संबंधित पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात झालेल्या पूर्व संशोधन साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला त्यामध्ये वाघ मंदा चिंतामण, धोडगे ज्ञानेश्वर धर्माजी, रामटेके एस. एन., गवई स्मिता, Hunasimorad S. I., Kirtiraji D.C., हिवराळे गजानन गणपत, मोहपात्रा गीतांजली, लांजेवार, ज्योती, मूलजाधव सुशीला, पवार उर्मिला, मून मिनाक्षी लिखित, कुसुम मेधवाल, रामटेके शि.ना., झुंबालाल कांबळे, संजीत तारदाळकर, आगलावे प्रदिप, डाहाट धनराज, B.L.Mungekar, सुर्या अनिल यांनी केलेल्या संशोधनाचा आढावा या संशोधनाच्या संदर्भात घेण्यात आला त्यामध्ये धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीवरील प्रभावा एकत्रित अभ्यास पूर्व संशोधनामध्ये कोठेही झालेला आढळून येत नाही हेच या संशोधनाचे पूर्व संशोधनाच्या तुलनेत वेगळेपण आहे.

### १.४ संशोधनाची उदिद्ष्टये :

१. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या सामाजिक स्थितीवर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन करणे.
२. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्थितीवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.
३. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक स्थितीवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

### १.५ संशोधन प्रश्न :

१. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या सामाजिक स्थितीवर सकारात्मक प्रभाव पडतो का?
२. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्थितीवर सकारात्मक प्रभाव पडतो का?
३. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक स्थितीवर सकारात्मक प्रभाव पडतो का?

### १.६ संशोधनाच्या परिकल्पना :

१. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या सामाजिक स्थितीवर सकारात्मक प्रभाव पडतो.
२. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्थितीवर सकारात्मक पडतो.
३. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक स्थितीवर सकारात्मक पडतो.

### १.७ संशोधनाच्या मर्यादा परिमर्यादा :

प्रस्तुत संशोधनामध्ये अमरावती विभागातील ग्रामीण भागातील बोध्द समाजातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीवर धम्मक्रांतीचा प्रभाव अभ्यासलेला आहे. यामध्ये अमरावती विभागातील ५ जिल्हयामधील ग्रामीण भागातील बौध्द समाजातील महिलांपूरतेच हे संशोधन मर्यादित आहे. धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलावरील प्रभाव हा त्यांच्या सामाजिक स्थितीमधील परिवर्तने, आर्थिक स्थितीमधील परिवर्तने आणि शैक्षणिक स्थितीमधील परिवर्तन यांचाच अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला आहे अन्य बाबींचा विचार या संशोधनामध्ये करण्यात आलेला नाही हयाच या संशोधनाची मर्यादा व परिमर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत.

### १.८ संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये ग्रामीण भागातील बौध्द समाजातील महिलांच्या संदर्भात त्यांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीच्या संदर्भात सर्वेक्षणाच्या माध्यमातुन आवश्यक तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे. अशाप्रकारे या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

### १.९ संशोधनाची जनसंख्या आणि न्यादर्श :


अमरावती विभागातील अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा या पाच जिल्हयातील ग्रामीण भागातील बौध्द समाजामधील एकूण महिला हया प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे. या जनसंख्येमधुन न्यादर्शाची निवड करण्यासाठी सहेतुक नमुना निवड प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये अमरावती विभागातील प्रत्येक जिल्हयामधुन अनुक्रमे १० गावांची निवड लॉटरी पध्दतीच्या माध्यमातुन करण्यात आली आणि या निवडलेल्या प्रत्येक गावामधुन अनुक्रमे १० महिलांची निवड लॉटरी पध्दतीच्या माध्यमातुन करण्यात आली आहे. या संशोधनाच्या संदर्भात न्यादर्शाचा आकार पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

**कोष्टक क्र. १.१ संशोधनाची जनसंख्या व जनसंख्या दर्शवणारे कोष्टक**

| अ.क्र | अमरावती विभागातील जिल्हे | गावांची एकूण सख्या | निवडलेली गावे | निवडलेल्या महिलांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अकोला | ९८६ | १० | १०० |
| २ | अमरावती | १९७७ | १० | १०० |
| ३ | यवतमाळ | २१३७ | १० | १०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | वाशिम | ७८९ | १० | १०० |
| ५ | बुलढाणा | १४४४ | १० | १०० |
| | **एकूण** | **७३५३** | **५०** | **५००** |

**१.१० न्यादर्श प्रक्रिया :**




**१.११ संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधन विषयाच्या उदिद्ष्टांशी संबंधित आवश्यक तथ्यांचे संकलन करण्यासाठी स्व-निर्मित ग्रामीण महिलांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीशी संबंधित प्रश्नावलीची निर्मिती करण्यात आलेली आहे. या प्रश्नावलीमधील विधानांचे आणि घटकांचे तज्ञांच्या माध्यमातुन प्रमाणिकरण करण्यात आले त्यांनी दिलेल्या सुचना विचारात घेऊन आवश्यक बदल प्रश्नावलीमध्ये करण्यात आले आहेत. त्यानंतर पथदर्शी अभ्यास करून या प्रश्नावतीची विश्वासनियता आणि वैधता तपासण्यात आली. त्यानंतर या प्रश्नावलीचा वापर संशोधनाशी संबंधित आवश्यक तथ्यांचे सकलन करण्यासाठी करण्यात आला आहे.

**१.१२ सांख्यिकीय तथ्य विश्लेषण :**

**सारणी क्र. १.१.१**

**धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांवरील प्रभाव दर्शवणारी सारणी.**

| प्रभावशिलता | उच्च प्रभाव | सामान्य प्रभाव | निम्न प्रभाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| **महिला संख्या** | **२६७** | **१७६** | **५७** | **५००** |
| **शेकडा प्रमाण** | **(५३.४०)** | **(३५.२०)** | **(११.४०)** | **१००** |
| **काई स्क्वेअर = १३३.१० ०.०१ स्तरावर सारणी मूल्य ९.२१० सार्थक आहे** | | | | |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीचा महिलांवरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य १३३.१० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलावर पडणाऱ्या प्रभावामध्ये सार्थक फरक आहे. त्यामध्ये सर्वाधिक ५३.४० % महिलांमध्ये धम्मक्रांतीचा प्रभाव सर्वाधिक आहे तर सर्वात कमी ११.४०% महिलांमध्ये निम्न प्रमाणात धम्मक्रांतीचा प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.

**सारणी क्र. १.१.२**

**धम्मक्रांतीमुळे ग्रामीण महिलाना प्राप्त होणाऱ्या सामाजिक व कौटुंबिक वागणूकीवरील प्रभावाचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| | **विवरण** | | | | **काई स्क्वेअर** | **सार्थकता** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **पुरूषापेक्षा कनिष्ठ** | **पुरूषाच्या बरोबरीचे** | **पुरूषापेक्षा श्रेष्ठ** | **सांगु शकत नाही** | | |
| **सामाजिक** | ३५ (७.००) | ३९७ (७९.४०) | ३९ (८.८०) | २९ (५.८०) | ७८९.६० | सार्थक आहे |
| **कौटुंबिक** | १२७(२५.४०) | २४१(४८.२०) | ४५(९.००) | ८७(१७.४०) | १७०.४० | सार्थक आहे |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीमुळे ग्रामीण महिलांना प्राप्त होणाऱ्या सामाजिक व कौटुंबिक वागणूकीवरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य अनुक्रमे ७८९.६० आणि १७०.४० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलाना प्राप्त होणाऱ्या सामाजिक व कौटुंबिक वागणूकीवर पडणाऱ्या प्रभावामध्ये सार्थक फरक आहे. त्यामध्ये सर्वाधिक ७९.४० % महिलाना समाजामध्ये पुरूषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त होते तर सर्वात कमी ५.८०% महिला यासंदर्भात काही सांगु शकल्या नाहीत. तसेच कौटुंबिक स्तरावर प्राप्त होणाऱ्या वागणूकीच्या बाबती सर्वाधिक ४८.२०% महिलांना पुरूषांच्या बरोबरीची वागणूक प्राप्त होते तर सर्वात कमी ९.००% महिलांना पुरूषापेक्षा श्रेष्ठ वागणूक प्राप्त होत असल्याचे आढळून आले.

**सारणी क्र. १.१.३**

**धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या निर्णय सहभागीतेवरील, पुजापाठ पध्दतीवरील, कौटुंबिक दर्जामधील बदलावर आणि सामाजिक सहभागीतेवरील प्रभावाचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| | विवरण | | | काई स्क्वेअर | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| **निर्णय सहभागीता** | होय | नाही | ___ | ४६.२० | सार्थक आहे |
| | ३२६ (६५.२०) | १७४(३४.८०) | ___ | | |
| **पुजापाठ पध्दत** | हिंन्दू पध्दतीने | बौध्द पध्दतीने | अन्य | ६६७.७९ | सार्थक आहे |
| | ३१(६.३५) | ४३५(८१.१४) | २२(४.५१) | | |
| **कौटुंबिक दर्जा मधील बदल** | होय | नाही | सांगु शकत नाही | ६६८.२० | सार्थक आहे |
| | ४३९ (८७.८०) | २२(४.४०) | ३९(७.८०) | | |
| **सामाजिक सहभागीता** | होय | नाही | ___ | २७६.८० | सार्थक आहे |
| | ४३६(८७.२०) | ६४(१२.८०) | ___ | | |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या निर्णय सहभागीतेवरील, पुजापाठ पध्दतीवरील, कौटुंबिक दजामधील आणि सामाजिक सहभागीतेवरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य अनुक्रमे ४६.२०, ६६७.७९, ६६८.२० आणि २७६.८० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलाच्या निर्णय सहभागीतेवर, पूजापाठ पध्दतीवर, कौटुंबिक दर्जामधील बदलावर आणि सामाजिक सहभागीतेवर सार्थक प्रभाव पडतो. त्यामध्ये सर्वाधिक ६५.२०% कौटुंबिक निर्णयामध्ये सहभागी होतात, सर्वाधिक ८१.१४% महिला बौध्द पध्दतीने पुजापाठ करतात, सर्वाधिक ८७.८०% महिलाच्या कौटुंबिक दर्जामध्ये सकारात्मक बदल झालेला आहे तर सर्वाधिक ८७.२०% महिलांची सामाजिक सहभागीता असल्याचे स्पष्ट होते.

**सारणी क्र. १.१.४**

**धम्मक्रांतीचा ग्रामीण महिला करीत असलेल्या व्यवसायावरील प्रभावाचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| **व्यवसायाचे विवरण** | **शेती** | **नोकरी** | **मजुरी** | **गृहिणी** | **शिक्षण** | **गृहउद्योग** |
|---|---|---|---|---|---|---|
| **संख्या** | ५७ | ५२ | १६६ | १५४ | २९ | ४२ |
| **शेकडा प्रमाण** | (११.४०) | (१०.४०) | (३३.२०) | (३०.८०) | (५.८०) | (८.४०) |
| | **काई स्क्वेअर = २१८.०० ०.०१ स्तरावर सारणी मूल्य १५.०८६ सार्थक आहे** | | | | | |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलां करील असलेल्या व्यवसायावरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य अनुक्रमे २१८.०० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलाच्या व्यवसायावर सार्थक प्रभाव पडतो. त्यामध्ये सर्वाधिक ३३.२०% महिला हया आजदेखील मजुरी व्यवसायामध्ये असल्याचे आढळून येते याशिवाय नोकरी करणाऱ्या १०.४०%, नोकरी करणाऱ्या १०.४०%, शेती करणाऱ्या ११.४०% आणि व्यवसाय करणाऱ्या ८.४०% महिला आहेत तर शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण ५.८०% असुन घरकाम करणाऱ्या महिला ३०.८०% असल्याचे आढळून आले.

**सारणी क्र. १.१.५**

**धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या मासिक उत्पन्नावरील प्रभावाचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| **कौटुंबिक मासिक उत्पन्न** | **१० हजार पेक्षा कमी** | **१०-२० हजार** | **२०-३०हजार** | **३०-४० हजार** | **४०हजार पेक्षा जास्त** |
|---|---|---|---|---|---|
| **संख्या** | ६५ | १२९ | ७८ | १४७ | ८१ |
| **शेकडा प्रमाण** | (१३.००) | (२५.८०) | (१५.६०) | (२९.४०) | (१६.२०) |
| | **काई स्क्वेअर = ७३.३० ०.०१ स्तरावर सारणी मूल्य १३.२७७ सार्थक आहे** | | | | |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या कौटुंबिक मासिक उत्पन्नावरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य अनुक्रमे ७३.३० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलाच्या कौटुंबिक मासिक उत्पन्नावर सार्थक प्रभाव पडतो. त्यामध्ये सर्वाधिक २९.४०% महिलांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न १० ते २० हजार रूपये आहे तर सर्वात कमी १३.००% महिलांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न हे १० हजार रूपयापेक्षा कमी असल्याचे आढळून आले.

**सारणी क्र. १.१.६**

**धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या आर्थिक दर्जावरील प्रभावाचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| **आर्थिक दर्जा** | निम्न | बरोबरीचा | उच्च | सांगता येत नाही |
|---|---|---|---|---|
| **संख्या** | २५९ | १६७ | १७ | ५७ |
| **शंकडा प्रमाण** | (५१.८०) | (३३.४०) | (३.४०) | (११.४०) |
| | **काई स्क्वेअर=२८८.१० ०.०१स्तरावर सारणी मूल्य ११.३४५ सार्थक आहे** | | | |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या आर्थिक दर्जावरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य २८८.१० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलाच्या आर्थिक दर्जावर सार्थक प्रभाव पडतो. त्यामध्ये सर्वाधिक ५१.८०% महिलांचा आर्थिक दर्जा हा निम्न असल्याचे आढळून आले तर सर्वात कमी ३.४० % महिलांचा आर्थिक दर्जा हा उच्च असल्याचे आढळून आले.

**सारणी क्र. १.१.७**

**धम्मक्रांतीमुळे ग्रामीण महिलाच्या आर्थिक निर्णयातील सहभागीतेवर, आर्थिक समाधानावर, कर्जाच्या गरजेवर, पूर्णवेळ रोजगारावर, रोजगारासाठी स्थालांतरणावर, परंपरागत व्यवसायातील बदलावर यावरील प्रभाव दर्शवणारी सारणी**

| | विवरण | | | काई स्क्वेअर | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| **आर्थिक निर्णयात सहभाग** | **होय** | **नाही** | अनिश्चित | ४६.२० | सार्थक आहे |
| | ३२६ (६५.२०) | १७४(३४.८०) | ०० (०.००) | | |
| **आर्थिक समाधान** | **होय** | **नाही** | अनिश्चित | १४.१० | सार्थक आहे |
| | २०८(४१.६०) | २९२(५८.४०) | ०० (०.००) | | |
| **कर्जाची गरज** | होय | नाही | अनिश्चित | ३४६.१० | सार्थक आहे |
| | ४५८(९१.६०) | ४२(८.४०) | ०० (०.००) | | |
| **पूर्ण वेळ रोजगार** | **होय** | **नाही** | **अनिश्चित** | १७७.६० | सार्थक आहे |
| | २९२(५८.४०) | १५९(३१.८०) | ४९(९.८०) | | |
| **रोजगारासाठी स्थानांतरण** | **होय** | **नाही** | अनिश्चित | ३०.८० | सार्थक आहे |
| | ३१२(६२.४०) | १८८(३७.६०) | ०० (०.००) | | |
| **परंपरागत व्यवसायात बदल** | होय | नाही | अनिश्चित | १७२.९० | सार्थक आहे |
| | ३९७(७९.४०) | १०३(२०.६०) | ०० (०.००) | | |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या आर्थिक निर्णयातील सहभागीतेवर, आर्थिक समाधानावर, कर्जाच्या गरजेवर, पूर्णवेळ रोजगारावर, रोजगारासाठी स्थालांतरणावर, परंपरागत व्यवसायातील बदलावर यावरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य अनुक्रमे ४६.२०, १४.१०, ३४६.१०, १७७.६०, ३०.८० आणि १७२.९० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, सर्वाधिक ६५.००%महिला आर्थिक निर्णयातील सहभागी आहेत. सर्वाधिक ५८.४०% महिलांना आर्थिक समाधान प्राप्त होत नाही. सर्वाधिक ९१.६०% महिलांना कर्जाची गरज आहे. सर्वाधिक ५८.४०% महिलांना पूर्णवेळ रोजगार आहे. सर्वाधिक ६२.४०% महिला रोजगारासाठी स्थानांतरण करतात. सर्वाधिक ७९.४०% महिलांनी आपल्या परंपरागत व्यवसायामध्ये बदल केला असल्याचे आढळून आले.

**सारणी क्र. १.१.८**

**धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक स्थितीवरील प्रभाव दर्शवणारी सारणी.**

| **शैक्षणिक स्तर** | **प्राथमिक** | **माध्यमिक** | **उच्च माध्यमिक** | **पदवीधर** | **पदव्युत्तर** | **व्यावसायिक शिक्षण** |
|---|---|---|---|---|---|---|
| **संख्या** | ६२ | ८८ | १३७ | ९८ | ३७ | २४ |
| **शेकडा प्रमाण** | (१३.९०) | (१९.७३) | (३०.७२) | (२१.९७) | (८.३०) | (५.३८) |
| | **काई स्क्वेअर = ११०.९०** | | **०.०१ स्तरावर सारणी मूल्य १५.०८६** | | **सार्थक आहे** | |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक स्थितीवरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य ११०.९० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलाच्या शैक्षणिक स्थितीवर सार्थक प्रभाव पडतो. त्यामध्ये सर्वाधिक ३०.७२% महिलाचे शिक्षण उच्च माध्यमिक स्तरापर्यंत झालेले आहे. तर सर्वात कमी ५.३८% महिलांनी व्यावसायिक शिक्षण घेतलेले आहे.

**सारणी क्र. १.१.९**

**धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक दर्जावर, रूढीवादी प्रवृत्तीवर आणि अन्याय यावरील प्रभाव दर्शवणारी सारणी.**

| | विवरण | | | काई स्क्वेअर | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| **शैक्षणिक दर्जा** | **साक्षर** | **निरक्षर** | ----- | ३०७.३० | सार्थक आहे |
| | ४४६ (८९.२०) | ५४ (१०.८०) | ----- | | |
| **रूढीवादीता** | **होय** | **नाही** | **अनिश्चित** | ४५३.२० | सार्थक आहे |
| | ४८८(९७.६०) | १२(२.४०) | ०० (००.००) | | |
| **अन्यायाला विरोध** | होय | नाही | सांगु शकत नाही | ५०३.१० | सार्थक आहे |
| | ४०२ (८०.४०) | ६९(१३.८०) | २९(५.८०) | | |

वरील सारणीमध्ये धम्मक्रांतीचा ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक दर्जावर, रूढीवादी प्रवृत्तीवर आणि अन्यायाच्या विरूध्द प्रतिकारावरील प्रभावाच्या संदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य अनुक्रमे ३०७.३०, ४५३.२०, ५०३.१० आहे. प्राप्त मूल्य ०.०१ स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, सर्वाधिक ८९.२०% ग्रामीण महिला हया साक्षर आहेत. सर्वाधिक ९७.६०% महिलांमध्ये रूढीवादीता आढळून येते. तसेच सर्वाधिक ८०.४०% महिला अन्यायाविरूध्द प्रतिकार करत असल्याचे आढळून आले.

**निष्कर्ष :**

१९५६ च्या धम्मक्रांतीचा ग्रामीण भागातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीवर प्रभाव पडतो परंतु पडणाऱ्या प्रभावाच्या प्रमाणाचा विचार केल्यास यामध्ये अपेक्षित प्रमाणात वाढ होण्यास आणखी बराच वाव आहे. सामाजिक स्थितीच्या संदर्भात सामाजिक प्रतिष्ठा, समाजाच्या विविध कार्यक्रमामध्ये त्यांची सहभागीता सामाजिक मंडळे आणि सामाजिक निर्णय यामधील स्थिती अपेक्षित प्रमाणात नाही. ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्थितीच्या संदर्भात बऱ्याचशा महिला

आजदेखिल मजुरी हाच व्यवसाय करतांना दिसतात नोकरी, उद्योग आणि लघु व मध्यम उद्योगामध्ये या महिलांचे प्रमाणात अपेक्षित प्रमाणात नसल्याचे आढळून येते. शैक्षणिक स्थितीच्या बाबतीत परंपरागत शिक्षणापेक्षा व्यावसायिक शिक्षणाकडे वळण्याची आजची गरज आहे याची चाहुल या ग्रामीण महिलाप्रर्यंत पोहचणे आजच्या काळामध्ये गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- पवार उर्मिला, मून मिनाक्षी (२०००), आम्हीही इतिहास घडवला, आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग (द्वितीय आवृत्ती), पुणे : सुगावा प्रकाशन.
- आगलावे डॉ. प्रदिप (२००९), धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन, औरंगाबाद : पुजा पब्लिकेशन.
- डाहाट धनराज (संपा.) (२०११), डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड १, स्त्री, (चतुर्थ आवृत्ती), नागपूर : संकेत प्रकाशन.
- साळुंखे आ.ह. (१९८९), हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई,
- गाडगीळ डॉ. स.रा. (१९७६), लोकायत, लोकवाङ्मय गृह, मुंबई,
- आंबेडकर भी.रा. (१९८१), हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती, नागपूर : सुगत प्रकाशन.
- सामंत मंगला (२००८) स्त्री पर्व, नेटवर्क पूणे : प्रकाशन.
- राजवाडे वि.का. (१९७६), भारतीय विवाह संस्थेचा इतिहास, लोकवाङ्मय गृह, मुंबई,
- जगताप मीनल, (२०१०), मराठा स्त्रियांचे स्थान, पूणे : सुगावा प्रकाशन.
- भागवत डॉ. विद्युत रेगे शर्मिला, (१९८९), स्त्री जीवनाची गुंतागुंत, लोकवाङ्मय गृह, मुंबई,
- खडसे प्रा. सुनिता, खडसे प्रा. संतोष केशव, (२०१०), ऐतिहासिक परिप्रेक्षातील स्त्रिया, पुणे : शुभम पब्लीकेशन.
- टिळक नारायण देवदत्त (१९८१), महाराष्ट्राची तेजस्वीनी, पं. रमाबाई, पणजी : कोहीनुर प्रकाशन.